(३९)

राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, सोलापूर.

## " मोबाईल मेडिकल युनिट - करमाळा " करीता ७ आसनी वाहन पुरवठा निवीदा

### आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.

# निवीदा

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

## निवीदा सुचना क्र. जिपसो/आरोग्य/NHM/MMU वाहन पुरवठा /०१/२०२५-२६.

..........................................................................................................

जिल्हा परिषद, सोलापुर कडील जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, सोलापुर अंतर्गत करमाळा तालुक्यांतील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविणेकामी मोबाईल मेडिकल युनिट ( फिरता दवाखाना ) हे राबविण्यात येत आहे.

मोबाईल मेडिकल युनिट मधील अधिकारी/कर्मचारी यांना, गावपातळीस्तरावर ने-आण करणेकामी बोलेरो व त्यास्वरुपाचे वाहन आवश्यक असल्याने, त्याकरीता स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित निवीदा रक्कम रु | निवीदा फॉर्म फी | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **मोबाईल मेडिकल युनिट, करमाळा<br>बोलेरो व त्यास्वरुपाचे ७ आसन क्षमतेचे वाहन पुरवठा** | **रु. ०७.२० लक्ष** | **रु. १०००/-** | **रु. १० हजार** |

| तक्ता अ :- दर सादर करावयाचा तक्ता | |
|---|---|
| निवीदा तपशिल | सादर करावयाचे दर |
| **मोबाईल मेडिकल युनिट, करमाळा करीता<br>बोलेरो व त्यास्वरुपाचे ७ आसन क्षमतेचे वाहन पुरवठा** | **प्रति किमी दर (इंधनासह)**<br>(Including GST) |
| दैनंदिन १०० ते १२० कि.मी यानुसार महिण्यातील २५ दिवसाकरीता अंदाजितपणे २५०० कि.मी ते ३००० कि.मी. करमाळा तालुक्यांतर्गत दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये फिरती | रु. ............ /- |

## ➢ निवीदेबाबत सर्व साधारण सुचना :-

१) निवीदा फॉर्म फी रु. १०००/- ही जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटीच्या नावे डिमांड ड्राफट स्वरुपात सादर करायची आहे. डिमांड ड्राफट हा कोणत्याही राष्ट्रीकृत बँकेकडील असावा. निवीदा मंजूर झाल्यानंतर संबधित पुरवठादार यांच्याकडून डिमांड ड्राफट स्वरुपात बायाना रक्कम स्विकारण्यात येईल.

२) डिमांड ड्राफट हा **District Integrated Health & Family Welfare Society, Solapur** या **संपूर्ण नावे** असावा.

३) अटी व शर्ती मान्य असले बाबत फर्मच्या लेटरपॅड वर घोषणापत्र सादर करावे. (घोषणापत्र नमुना शेवटी दिलेले आहे)

४) निवीदेतील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास, निवीदा अवैध ठरविली जाईल. तसेच उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

५) कागदपत्रे माहिती असलेला लिफाफा क्र. १ व दर नमुद असलेला लिफाफा क्र. २ असे दोन्ही लिफाफे **एका बंद लिफाफा** मध्ये टाकून, सिलबंद लिफाफा **जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.सोलापुर** येथे सादर करावेत. सदरील लिफाफे वर मोबाईल मेडिकल युनिट करीता दरपत्रक असे नमुद करावे.

६) सदरील लिफाफे हे दि.३० /०३/२०२६ ते दि.०९ /०४/२०२६ या कालावधीत स्विकारुन दि.१३/०४ /२०२६ जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, आरोग्य विभाग, जि.प.सोलापुर येथे दु. ०१.०० वा उघडण्यात येतील.

७) वाहनांची निमिर्ती व नोंदणी ही सन **दि. ०१ जानेवारी २०१८** नंतरची असावी.

८) वाहनाचा परवाना हा Taxi प्रकारातील असावा.

९) वाहनाचे RTO कार्यालयाकडील फिटनेस प्रमाणपत्र असावे. वाहनाबाबतचे RTO कडील सर्व परवाने व विमा असावा. वाहनांचे RTO विभागाकडून निर्गमित केलेले वायु प्रदूषण बाबतचे प्रमाणपत्र असावे.

१०) वाहनांची प्रतिमाह झालेली फिरती ची लॉगबुक मध्ये नोंद ठेवावी लागेल. त्याकरीता वाहनाकरीता स्वतंत्ररित्या लॉग बुक असावे. प्रतिदिन झालेली फिरती करीता वैदयकिय अधिकारी - MMU यांची स्वाक्षरीचे सादर केल्याशिवाय वाहनांची देयके अदा केली जाणार नाहीत.

११) वाहन हे प्रत्येक महिन्यामध्ये एकुण २५ दिवस फिरतीकरीता उपलब्ध असणे अपेक्षित आहे. सुट्टी असलेल्या दिवशी सदरील वाहनांची दुरुस्ती असणे अपेक्षित आहे. मोठया दुरुस्तीच्या कारणामुळे वाहन पुरविणे शक्य न झाल्यास, त्यादिवशी दुसरे वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही वाहन पुरवठाधारक यांची राहिल. त्याचसोबत वाहनास दुरुस्तीकरीता वेळप्रसंगी येणारे किरकोळ खर्च (उदा: हवा, पंक्चर, वंगन, इ.) हे पुरवठादार यांना करावे लागतील.

१२) निवीदा उघडण्यात आलेनंतर प्राप्त निवीदानुसार अंतिम पात्र ठरणा-या निवीदाधारकातुन लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. त्यानुसार न्युनतम पुरवठाधारकास, कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

१३) वाहन पुरवठा करणेबाबतचा दर्जा निकृष्ठ आढळून आल्यास त्याबाबतचे देयक अदा केले जाणार नाही यांची नोंद घेण्यात यावी.

१४) वाहन पुरवठाबाबतचा दर्जा वारंवारपणे निकृष्ठ दर्जाचे आढळून आल्यास, त्यानुसार आपणास वारंवार सुचना देऊनही आपणाकडील पदार्थांचा दर्जा निकृष्ठ आढळून आल्यास, निवीदा रद्द करण्याच्यो अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सोलापुर यांनी राखून ठेवलेले आहेत.

१५) देयके मासिकानुसार अदायगी करण्यात येईल. तसेच देयकातुन योग्य त्या शासकिय कपाती (TDS/GST) करुन देयक अदायगी केली जाईल यांची नोंद घेण्यात यावी.

१६) निवीदा मंजूर झालेल्या निवीदाधारकाकडून अटी व शर्ती बाबतचा रु.१००/- चा बॉन्ड पेपरवर अटी व शर्ती मान्य असलेल्याचा करारनामा हा २ साक्षीदाराच्या स्वाक्षरीनिशी सादर करावा लागेल.

१७) निवीदा मंजूर झाल्यानंतर निवीदेचा करार संपेपर्यन्त निवीदा रद्द करता येणार नाही.

१८) निवीदाधारकांने करार नाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास निवीदाधारकावर नियमानुसार योग्य ती दंडात्मक कारवाई प्रस्तावित केली जाईल.

१९) सदरील निवीदेमध्ये घेण्यात आलेले दर हे एक (०१) वर्षाकरीता वैद्य राहतील.

२०) निवीदेतील वाहन पुरवठा करण्याचे दर हे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, सोलापूर यांनी ठरविल्यापेक्षा कमी असावेत.

२१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापुर यांनी निवीदा स्विकारणे/नाकारणे/ निवीदा रद्द करण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवलेले आहेत.

## ➢ लिफाफा क्र. ०१ मधील कागदपत्रे :-

१) रु. १०००/- निवीदा रक्कमेचा राष्ट्रीकृत बँकेचा डिमांड ड्राफट.

२) निवीदेसोबत सादर केलेल्या प्रपत्रानुसार निवीदेच्या अटी व शर्ती विना अट मान्य असलेबाबत अधिकृत घोषणापत्र. (घोषणापत्र नमुना सोबत शेवटच्या पानावर जोडलेला आहे. सदरील नमुना हा संस्थेच्या लेटरपॅडवर सही व शिक्कासह सादर करावे.)

३) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ प्रमाणपत्र व नुतनीकरणाची प्रत.

४) GST नोंदणींचे प्रोबेशनल प्रमाणपत्र अथवा मुळ प्रमाणपत्र.

५) Financial Year २०२५-२६ (Assessment Year २०२६-२७) या अर्थिक वर्षाचे आयकर भरल्याची पावती.

६) निवीदाधारक किंवा फर्मच्या नावाने असलेले बँक स्टेंटमेंट (माहे एप्रिल २०२५ - माहे मार्च २०२६ अखेर)

७) निवीदाधारक किंवा फर्मच्या नावाने असलेले पॅन कार्ड.

८) पुरवठा करण्यात येत असलेल्या वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र ( Registration Certificate )

९) पुरवठा करण्यात येत असलेल्या वाहनांचे पॉलिसी विषयक कागदपत्रे

१०) पुरवठा करण्यात येत असलेल्या वाहनांचा Taxi परवाना व वैधतेबाबतची कागदपत्रे

११) पुरवठा करण्यात येत असलेल्या RTO कार्यालयाकडील फिटनेस प्रमाणपत्र

१२) RTO कार्यालयाकडील मान्यता असलेले केंद्रांकडील वायू प्रदुषण बाबतचे प्रमाणपत्र

**वरील अ.क्र. ०१ ते १२ कागदपत्रे स्व: सांक्षाकित करुन लिफाफा क्र. १ मध्ये समाविष्ठ करावी**

## ➢ लिफाफा क्र. ०२ मधील कागदपत्रे :-

१) संस्थेच्या / फर्मच्या लेटर पॅडवर तक्ता अ नुसार सादर करावयाचे दरांचा तपशिल

## ➢ पुरवठादारास दर भरणेकामीची सुचना :-

पुरवठादाराकडून नमुद केले जाणारे दर हे GST च्या रक्कमेसह ग्राहय धरुन टाकण्यात यावेत.

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापुर.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापुर.**

# DECLARATION OF THE BIDDERS

( To be submitted by contractor on contractors letter head in .pdf format)

**To,**

**District Health Officer - Member Secretary,**
**District Integrated Health and Family Welfare Society,**
**National Health Mission, Health Department, Zilha Parishad, Solapur.**

**Name of Work :- To Provide 4 Wheeler Vehicle for Mobile Medical Unit Under NHM, Health Department, Zilla Parishad, Solapur.**

**I/We hereby declare that**

1) I/We are interested in the above named work in the tender notice.
2) I/We have submitted a tender for the said work.
3) I/We have made my self / ourselves thoroughly conversant with the local condition regarding tender condition on which I/We have based my/Our rates for this tender. Have been carefully studied and understood before submitting this tender.
4) I/We accept all the terms and condition laid down in the tender document.
5) The rate quoted by me/us is unconditional; I/We understand that conditional ender is liable for rejection.
6) I/We declaring that the firm is not black listed with any government organizations and will not Provide Vehicle Service having illegal documents

**Signature and Stamp**
**(Bidder)**

( संस्थेच्या लेटरपॅडवर लिफाफा क्र. २ मध्ये, दर सादर करावयच्या पत्राचा नमुना )



दिनांक :-  /  /२०२६

प्रति,

**मा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जि.प.सोलापूर.**

**विषय :- मोबाईल मेडिकल युनिट - करमाळा करीता ७ आसनी वाहन पुरवठा निवीदाकरीता दरपत्रक सादर करीत असलेबाबत.**

**संदर्भ :- आपल्या कार्यालयाकडील वाहन पुरवठा निवीदा**

**मा. महोदय,**

वरील विषयान्वये, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मोबाईल मेडिकल युनिट - करमाळा अंतर्गत ७ आसनी वाहन पुरवठा करणेबाबत निवीदा जाहिर करण्यात आलेली असून, सदरील निवीदेकरीता आमच्या संस्थेकडून खालील तक्तानुसार दर सादर करण्यात येत आहेत.

| निवीदा तपशिल | सादर करावयाचे दर |
|---|---|
| **मोबाईल मेडिकल युनिट, करमाळा करीता बोलेरो व त्यास्वरुपाचे ७ आसन क्षमतेचे वाहन पुरवठा** | **प्रति किमी दर (इंधनासह)** (Including GST) |
| दैनंदिन १०० ते १२० कि.मी यानुसार महिण्यातील २५ दिवस करीता अंदाजितपणे २५०० कि.मी ते ३००० कि.मी. करमाळा तालुक्यांतर्गत दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये फिरती | रु. ............. /- |

वरील तक्तानुसार आमच्या संस्थेकडून दर सादर करण्यात येत असून, आमच्या संस्थेस मोबाईल मेडिकल युनिट अंतर्गत वाहन पुरवठा करण्याची संधी उपलब्ध होणेस विनंती.

( सही व संस्थेचा शिक्का )